# विनोबा-वार्ता

मासिक वर्गणी १.५० न. पै.

अंक : ९१ ) वर्धा, वुधवार ता. १ जुलई १९६४ ( मूल्य ५ न.पं

# कम्युनिस्टांशी झालेली

## विनोबाजींची चर्चा

ता. २६ ला सकाळीं ९॥ वाजतां ब्रह्मविद्या मंदिरांत वर्ध्यांतील कम्युनिस्ट कार्यकर्ते विनोबाजींना भेटण्यास गेले. परिचय झाल्यानंतर व कुशल प्रश्न विचारल्या नंतर बाबांनी कम्युनिस्ट मित्रांना विचारलें "तुम्ही तोंडाने भांडवल शाहीच्या विरुद्ध असून कृतीने भांडवलशहांना पोषण कां देतां ? उदाहरणार्थं तुमच्या अंगावरील मिलचा कपडा दरडोई पंधरा रुपयांचा करभार दरवर्षी भांडवलदारांना देत आहे. अशा रीतीने भांडवलदार मजुरांचें जें शोषण करतात त्यांत तुम्ही सहभागी कां होता ? त्याऐवजीं खादी वापरून हा भांडवलदारांना मिळणारा कर कां संपवीत नाही " ? कम्युनिष्ट– " कारण आम्ही विज्ञानाचे व यंत्रीकरणाचे पुरस्कर्ते आहांत. खादी हा मध्ययुगीन, जुनाट विचार आहे. कारखाने सरकारचे व्हावेत यासाठी आम्ही चळवळ करीत आहोंत. कारखान्यांचे राष्ट्रीयकरण झाल्यावर शोषण बंद होईल-- हा आमचा विचार आहे.

विनोबा– दीर्घंकाळांत मिलचें कापड बरें की खादी बरी हा वाद क्षणभर बाजूला ठेवून जोपर्यंत तुमच्या म्हणण्याप्रमाणे गिरण्या सरकारच्या होत नाहींत तोंवर खादी वापरून भांडवलवाल्यांशी याबाबतींतला सहकार बंद करून गिरण्यांवर सरकारचा ताबा करण्याचा दिवस तुम्ही लवकर कां आणीत नाहीं ? तुम्ही भांडवलदारांविरुद्ध तोंडाने बडबड करतां व प्रत्यक्षांत त्यांना मदत करतां. मी तोंडाने विरुद्ध न बोलतां कृतीने त्यांची रसद तोडतो. तुमच्या शब्दांतील व कृतींतील विरोध तुम्हाला कसा समजत नाहीं ?

कम्युनिष्ट– पण खादीचा वापर केल्याने प्रगतीच्या घड्याळाचे कांटे मागे फिरतील व आम्ही विज्ञानयुगास पारखें होऊन मध्ययुगांत जाऊं. शिवाय नजीकचा भविष्यकाळ व सुदूर भविष्यकाळ यांतील कृतींत विरोध येईल.

विनोबाजी– तें तर अनेकदां तुम्ही करतां. उदाहरणार्थ कम्यूनिष्ट पक्ष उत्पादनांच्या साधनांच्या व्यक्तिगत मालकीच्या विरुद्ध आहे. परंतु केरळमध्यें कम्युनिष्ट सरकारने १५ एकर बागाइत जमीनीचे सीलिंगचें बिल आणलें. तेथील १५ एकर बागायत जमिन म्हणजे आपल्या इकडील ७५ एकर बागायत जमीन म्हणजे किमान ३०० एकर कोरडवाहू जमीन झाली– इतकी तेथे जमीन कमी व लोकसंख्या दाट आहे. मी त्यावेळीं तेथे ग्रामदानाचा म्हणजे मालकी-विसर्जनाचा प्रचार करीत होतों. म्हणजे कम्युनिष्ट सरकार तत्वतः मालकीच्या विरुद्ध असून मध्यकाळांतील पॉलिसी म्हणून १५ एकर बागायत जमिनीची मालकी कायद्याने पक्की करीत होते. तद्वतच दीर्घकाळांत यंत्रीकरणाचा तुमच्या विचारावर तुम्ही कायम राहून जोपर्यंत गिरण्या राष्ट्राच्या होत नाहींत तोवर, म्हणजे संक्रमणकाळांत, तुम्ही खादी कां वापरीत नाही ? आता सरकारने हातसुताची विणाई फुकट केल्यामुळे मोठी सोय झाली आहे. शिवाय तुम्हाला वाटते त्याप्रमाणे खादी विचार मध्ययुगीन वा विज्ञानाच्या विरुद्ध नाही. प्रथम लोक हाताने सूत काढीत होते, नंतर तकलीने सूत कातूं लागले, तकली वरून चरखा आला, आता अंबरचें आगमन झालें आहे व दुसरा उद्योग मिळल्यास व शोषणमुक्त परिस्थितींत अंबर विजेनेहि चालूं शकेल.

कम्युनिष्ट– मग तुमचें म्हणणे काय की आम्ही सूत कातावे ?

विनोबाजी– अवश्य, तुम्ही अर्धातास, पाऊणतास, फुरसतीच्या वेळीं सूत कातावें, कताई हा 'सिम्बॉल' (निशाण) आहे. फुरसत नसल्यास तुम्ही विकतची खादी वापरली तरी हरकत नाही. पण तुम्ही गिरणीमालकांना हा जो मलिदा देतां तो बंद करा. तुम्ही तोंडाने विरुद्ध व कृतीने अनुकूल असल्यामुळे मिलमालक तुमच्या बडबडीस भीक घालीत नाहीत. यामुळे समाजव्यवस्था बदलत नाही. हें तर असेंच झालें की एखादा लवकर मरावा म्हणून तोंडाने घोषणा कराव्यात व प्रत्यक्षांत त्याला पौष्टिक खुराक द्यावा. त्यामुळे भांडवलवाले लोंचट बनले आहेत कारण त्यांना पोषण मिळते.

बरें, असो, तुमचा कल मॉस्कोकडे आहे की पेकिंगकडे.

कम्युनिष्ट – आम्ही तटस्थ आहोंत.

विनोबाजी – मला हें समजत नाही की मॉस्को व पेकिंगकडे आपली बुद्धि गहाण न टाकतां तुम्ही आजच्या जागतिक व भारताच्या परिस्थितीला धरून तुमचें धोरण कां बनवीत नाहीं ? आज अणुयुग सुरू आहें अशा वेळेला कृश्चोव्ह सुद्धां युद्ध टाळण्याची भाषा बोलत आहे. व तसें वागत आहे. हा नवीन जागतिक संदर्भात विचार झाला. तद्वतच भारतां भीषण बेकारी असतांना व दुसरा धंदा नसतांना तुम्ही खादीचा पुरस्कार कां करीत नाही ? उद्या गिरण्या राष्ट्राच्या झाल्यावर व दुसरा धंदा लोकांना मिळाल्यावर चरखा सर्पण बनेल. पण तोंवर ?

कम्युनिष्ट-कारखाने राष्ट्राचे व्हावेत याचें समर्थन आपण कराल काय ?

विनोबाजी– ताबडतोब. आम्ही हें समर्थन दहा बारा वर्षापूर्वीच केलें आहे. सर्वोदय योजना प्रकाशित झाली आहे. तींत म्हटलें आहे की गिरण्या, मोठे कारखाने, खाणी राष्ट्राच्या मालकीच्या राहतील. पण तुम्ही आजकाल स्वतःचेंच वाङमय २० वर्षापूर्वी जेवढे वाचीत होतां तेवढें वाचत नाही. मग आमचें वाङमय कोण वाचणार ? केवळ तुम्हालाच हें लागू नाही. कॉंग्रेसवाले काय, अन्य पक्षांतील लोक काय, सर्वांचेंच अध्ययन कमी झालें आहे.

कम्युनिष्ट– तात्कालिक प्रश्नांबाबत तुम्ही मतप्रदर्शन करीत नाही. उदाहरणार्थ अन्नधान्याचा प्रश्न.

विनोबाजी-मी त्यावर माझे विचार प्रधानमंत्र्यांना जामनीला सांगितले. हे विचार माझे अनेक वर्षांपासून आहेत व ते अनेकदां प्रकाशित झाले आहेत. गांवासाठी वर्षभराचें धान्य गांवांत ठेवणें, शेतमजुरांना व सरकारी अधिकाऱ्यांना वेतनाचा एक ठराविक हिस्सा धान्यांत देणें, शेतसारा धान्यांत वसूल करून जागोजागीं धान्यसंग्रह करून तो अन्य लोकांना योग्य किंमतींत देणें ही माझी योजना आहे. अन्य तात्कालिक प्रश्नावरहि मी माझे विचार प्रदर्शित करीत असतो. उदाहरणार्थं अनिवार्य बचत योजनेच्याविरूद्ध मीं बोललों होतो. कॉंग्रेसचे लोक मनांत असून शिस्तीमुळे विरूद्ध बोलत नव्हते; अन्य पक्षांच्या बोलण्याला फारशी किंमत नव्हती. हा लोकशाहीत धोका आहे असें ओळखून मीं त्या योजने विरूद्ध बोललों, ही योजना रद्द झाली की ती काय तुमच्या मोर्च्यांमुळे झाली की त्यासाठी माझें वक्तव्य हें कांही अंशी कारणीभूत झालें ? तुमच्या मोर्च्यांत माझें सामिल होणेंबरें झालें असते काय ?

कम्युनिष्ट – नाही. तुमच्या वक्तव्याला निश्चिय योजना रद्द करविण्याचें एका प्रमाणांत श्रेय द्यावें लागेल. आम्ही ग्रामदानासाठी कांय करावें ?

विनोबाजी– तुमचा जेथे जोर असेल तेथे याचा प्रचार करा.

कम्युनिष्ट – तुमचे विचार आम्हाला नवीनच वाटतात. म्हणून आम्ही तुमच्याशी मधूव मधून चर्चा करूं इच्छतो.

विनोबाजी–तुम्ही अवश्य येत चला. मी तुम्हांला तुम्ही मागाल त्यापेक्षा जास्त वेळ देईन. एक गोष्ट सोडून मी सर्व कांही करीन. ती गोष्ट म्हणजे मी तुमच्या पक्षाचा सदस्य होणार नाही.

कम्युनिष्ट– नाही. तुम्ही होऊं नका. तुम्ही व्यापक रहा.

विनोबाजी– तुम्ही तुमची बुद्धि वापरली हें छान झालें. कांग्रेसवाल्यांहि मी एकदा असेंच म्हणालों असतां तेंहि म्हणाले होते की तुम्ही आमच्या पक्षाचे सदस्य होऊं नका. मी सर्वांहून अलग राहण्यांतच सर्वांचा फायदा आहे.

-------

विनोबांनी सांगितलेली–

## परंधाम आश्रमाची कथा

हे जे स्थान बनले आहे. ते १९३८ साली जमनालालजींनी बनविले आहे. पाहुणे आदि मंडळी येतात म्हणून चांगले दृश्य बघून त्यांनी हे ठिकाण शोधून काढले. परंतु १९३८ सालांत कोणीच इकडे आले नाही. त्यावेळी मी आजारी पडलो. हवा पालट करण्यासाठी मी जावे अशी चर्चा सुरू झाली. बापूजींनी अनेक स्थळांचा निर्देश केला परंतु मी त्याला संमती दिली नाही आणि पवनारलाच आलो. पहिल्यांदाच मी, येथें येत होतो. जमनालालजींना वाटले की आश्रमासाठी हे उपयुक्त ठिकाण आहे, तेव्हा पासून येथे आश्रमाची स्थापना झाली.

येथे ज्या मूर्ति ठेवल्या आहेत. त्या येथेच निघाल्या आहेत. इतिसकारांचे म्हणणे आहे की गुप्त साम्राज्य आणि वाकाटक साम्राज्याच्या काळातील ह्या मूर्ति आहेत. भारतभर प्रवासात माझ्या अवलोकनात ज्या मूर्ति आल्या त्यावरून मलाहि इतिहासकारांचा अंदाज बरोबर वाटतो. १३०० – १५०० वर्षांपूर्वीचा तो काळ आहे. त्या सर्व मूर्ति जमीनीत गडप झालेल्या होत्या.

त्यापैकी भरत–रामाच्या मूर्तीची ( भरत राम मंदिरात ) जी स्थापना आम्ही केली त्यामागे अेक इतिहास आहे. हे ठिकाण जेव्हा मी पसंत केले तेव्हा ही सर्व जमीन पडीत पडलेली होती. वाईट स्थितीत होती. कुदळीने खोदण्यास सुरुवात केली. तेव्हा माझ्या कुदळीला ती मूर्ति लागली. ही १९४८ सालची गोष्ट आहे.

# ग्रामदानी गावातील निर्माण कार्याबाबत काही विचार

वर्धा जिल्हयात ग्रामदानी गावांना मदत व्हावी असा कळकळीचा बहुमुखी प्रयत्न चालला आहे. वर्धा जिल्हयाच्या दृष्टीने ही अेक मोठी आशाजनक घटना आहे.

हे कार्य चांगल्या तऱ्हेने पार पडण्यासाठी ज्याला मदत करायची त्याची परिस्थिति चांगली अवगत असावी लागते आणि मदतीमागील दृष्टीहि साफ असावी लागते.

ग्रामदानी गावांचा विकास करणे हे काही स्वयंभू स्वतंत्र काम नाही. सर्वोदय आंदोलनाच्या साखळी मधील ती अेक मधली कडी आहे. तेव्हा मूठभर ग्रामदानी गावांचा विकास करण्यापुरता हा मर्यादित प्रश्न नाही. अेका सकल कल्याणकारी समाजरचनेच्या उभारणीचा तो प्रयास आहे. त्याचा प्रारंभ मालकी हक्काच्या व्यापक प्रमाणावर विसर्जनापासून होतो आणि त्याची परिणती शासनमुक्त शोषणविहीन समाज रचनेत व्हावयाची आहे. किंवा अहिंसक विकेंद्रित लोकशाही समाजवादी समाजरचनेत व्हावयाची आहे. तेव्हा भारतातील लक्षावधि गावांचे ग्रामदानाने त्याचा प्रारंभ होतो आणि ग्रामस्वराज्याच्या प्रस्थापनेने ते ध्येय साकार होते.

ही अेक व्यापक समाजक्रांति आहे हे ध्यानात आल्यावर थोड्या गावांनी ह्या कार्यात आल्याने हे कार्य सिद्ध होत नाही हे सहजच ध्यानात येते. वर्धा जिल्ह्याबाबतच बोलायचे झाल्यास ५५ ग्रामदाना अैवजी ५५० गावाचे ग्रामदान झाले तरच सामाजिक क्रांति मूल्यपरिवर्तनाची क्रांति ह्या जिल्ह्यांत झाली हे सिद्ध होईल.

केवळ पंचावन्न गावात आम्ही त्यागावर आधारलेला शोषणविहीन समाज निर्माण करू शकणार नाही. शेजारच्या गावात स्वार्थावर आधारलेली विषमतेवर आधारलेली समाजरचना जशीच्या तशीच चालू राहिली, निवडणुकांचे झगडे चालू राहिले; तर त्याचा प्रभाव ह्या मूठभर गावावर पडणारच कारण आज समाजकारण, अर्थकारण, राजकारण इतके परस्पर संबंध निर्माण झालेकी कोणाचाहि सोवळेपणा टिकायचाच नाही. अगोदर काही ग्रामदानी गावांचा विकास करून दाखवू मग बाकीची गावे करू हा विचार त्यामुळेच अव्यावहारिक वाटतो.

म्हणूनच विनोबाजी म्हणतात 'फॅमिली प्लॅनिंग' कुटुंब नियोजनाचा सिद्धांत ग्रामदानावर लागू होत नाही. उलट ग्रामदानांची संख्या वाढली तरच सरकारचे नियोजनहि ग्रामाभिमुख होईल. शहरांचे खेड्यावरील वर्चस्व कमी होऊन दोहोंनाहि आपले योग्य स्थान प्राप्त होईल.

जितकी ग्रामदाने अधिक होतील तितकी गरिबांना अधिक लवकर मदत पोहचेल, तितक्या लवकर समाजातील स्वार्थाचा संकोच होईल, तितक्या लवकर गावे स्वतःच्या पायावर उभी होतील. मजबूत बनतील आणि सरकार चिंतामुक्त होऊन त्याचे अडचणीशी सामना देण्याचे सामर्थ्य वाढेल. तेव्हा ग्रामदानी गावे वाढविणे हाच ग्रामदानी गावांना यशस्वी करण्याचा हमखास मार्ग आहे. ही पहिली गोष्ट झाली.

दुसरी महत्माची गोष्ट म्हमजे ग्रामदानी गावात काम करायची दृष्टी काय असावी ? ग्रामदानी गावात कल्याणकारी समाज रचना तर निर्माण करायची आहे. पण ती ग्रामस्वराज्याच्या पायांवर उभी करायची आहे. त्यांना त्यांच्या पायावर उभे करायचे आहे. बाहेरील मदत ही पांगुळगाड्यासारखी मानायची. ग्रामदानी गावातील लोक पावले टाकतील पण त्यांचा तोल जाऊ नये म्हणून मदतीला हा पांगुळगाडा. जसे शिक्षक विद्यार्थ्याला लिहून देत नाही लिहिणे वाचणे शिकवितो. त्यासाठी प्रसंगी त्याचा हातहि हातात घेतो पण शेवटी त्यालाच लिहावयास लावतो. म्हणजे धोरण हे राहील की लोकांनी योजना आखाव्यात, त्यासाठी त्यांनी आपली बुद्धि, शक्ति, साधन संपत्ति पणाला लावावी आणि त्यांच्या उणीवांची पूर्ति ह्या बाहेरच्या मदतीने व्हावी. असे झाले तरच खेड्यांचा स्वाभिमान टिकेले, त्यांच्यात आत्मविश्वास जागेल आणि स्थानिक नेतृत्व उदयाला येईल.

हे सर्व होण्यासाठी ग्रामसभा ही सार्वभौम संस्था मानली जावी. कोणतीहि बाहेरील मदत सरळ गावात न जाता ती ग्रामसभेच्या माध्यमातून दिली जावी. ग्रामसभेने त्याबाबत निर्णय घेतलेला असावा आणि त्याबरहुकुम काम चालावे. त्यामुळे कामात अेकसूत्रीपणा येईल, ग्रामसभा मजबूत बनेल आणि ग्रामस्वराज्य उभे होईल.

लोक आपल्या गरजा भागविण्यासाठी योजना आखतील तेव्हा त्यांना मनुष्यसंपत्ति, पशुसंपत्ति, निसर्गसंपत्ति ह्यांचा सर्वे करून देणे, लोक उत्पन्न वाढीच्या योजना आखतील तेव्हा त्यांना योग्य ती साधनसामुग्री, तांत्रिक ज्ञान, भांडवल देणे, लोकांना सुज्ञ बनविण्यासाठी प्रशिक्षणाची सोय करणे इ. मदत करवी लागेल. शाळा कॉलेजचे विद्यार्थी व शिक्षक सर्वे करून देतील व नवीन ज्ञान देतील; सरकारी अधिकारी व तज्ञ लोक तांत्रिक ज्ञान, सावने सुधारलेले बी, नवेनवे उद्योग देतील; व्यापारी भांडवल देतील.

ग्रामदानी गावात जी कामे उभी करायची आहेत त्यात दोन गोष्टीवर जोर द्यावयाचा आहे. जे सर्वात खालचे आहेत म्हणजे गरीब, बेकार, अनाथ, आजारी, बालक त्यांना प्रथम सहाय्य करायचे आहे. दुसरी गोष्ट म्हणजे सुखसोयीवर भर देण्यापेक्षा प्रथम उत्पादन वाढविण्याकडे शक्ति केंद्रित करायची आहे. किमान, अन्न, वस्त्र आणि राहण्यासाठी स्वतःची जागा प्रत्येकाला प्रथम उपलब्ध करावयाची आहे.

लोकांची शक्ति वाढेल तेव्हाच उत्पादन वाढेल. त्यासाठी व्यसन निर्मूलन, भांडणाची आपसात सोडवणूक आणि नित्य नवे ज्ञान प्राप्त व्हावे म्हणून गावात अेक-तासाचा श्रवण वर्ग चालावा. गावाचे आर्थिक शोषण थांबविणे हाहि त्यांचा उत्पादन वाढीचा अेक मार्ग आहे. त्यासाठी वस्तूंची व मालाची खरेदी-विक्री सामूहिक व्हावी अशी योजना बनवावी लागेल. हे सर्व करण्यासाठी गावातील होतकरू लोकांना निरनिराळ्या क्षेत्रांत प्रशिक्षित करावे लागेल. आणि गावातील कारागिरांना पण चांगले प्रशिक्षण द्यावे लागेल.

ही सर्व कामे करण्यासाठी ग्रामसभेच्या पोटकमिट्या निर्माण करून त्यांच्याकडे निरनिराळ्या कामाची जबाबदारी सोपवावी लागेल.

ग्रामदानी गावांचे संघ बनवून त्या गावात व शेजारी गावातहि सहकार्य घडवून आणण्याची यंत्रणा उभी करावी लागेल.

—वसंत बोंबटकर

(परंधाम आश्रमाची कथा)

त्यामागें अेक फार मोठा इतिहास आहे. तुम्ही 'गीता प्रवचने' पुस्तक वाचले असेल. १९३२ सालीं धुळ्याच्या जेलमध्ये मी ती प्रवचने दिली आहेत. तेव्हा १२ व्या अध्यायात मी सगुण निर्गुण उपासनेची तुलना केली आहे. त्यासाठी दोन दृष्टांत दिले आहेत. अेक लक्ष्मणाचा आणि दुसरा भरताचा. लक्ष्मणाची सगुण उपासना होती तर भरताची निर्गुण उपासना होती.

## —: सूचना :—

साम्ययोग साप्ताहिक आणि साम्ययोग दैनिक (विनोबा वार्ता) ह्या दोहोंचे प्रकाशन सेवाग्राम ऐवजी वर्ध्यावरून होत आहे.

तेव्हा ह्यापुढील पत्र व वर्गणी —

"व्यवस्थापक,
साम्ययोग कार्यालय, मगनवाडी
वर्धा."

ह्या पत्त्यावर पाठवावी. ही विनंती.

व्यवस्थापक
साम्ययोग

संपादक :- श्री. गोपाळराव काळे, श्री. वसंतराव बोंबटकर,
प्रकाशक :- श्री. वसंतराव बोंबटकर,
मुद्रक :- गो. भा. जोशी, भास्कर प्रेस, वर्धा.
स्वामित्व :- महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, मुंबई.




साम्ययोग : दैनिक ता. १-७-६४ अं. ९१ र. नं. एन. २९५
विनोबा वार्ता, मगनवाडी, वर्धा ( महाराष्ट्र राज्य )

श्री पूज्य - विनोबा
मु. पो. - पवनार
जि. - वर्धा